आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१५ जुलै २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना करण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

- मध्य प्रदेशात प्राईम मिनिस्टर कॉलेज ऑफ एक्सलंसचं केंद्रिय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन

- जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात भारतीय भांडवली बाजारात परकीय संस्थांकडून २४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक

- नेपाळचे प्रधानमंत्री म्हणून के पी शर्मा ओली यांनी घेतली शपथ / प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून अभिनंदन

**आणि**

- गुजरातमध्ये अहमदाबाद-बडोदा द्रुतगती मार्गावर आज झालेल्या अपघातात ६ जणांचा मृत्यू, ६ जण जखमी

**<><><><><>**

महाराष्ट्र शासनाने वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना केली असून याचं मुख्यालय पंढरपूर इथंच राहणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूरात केली. ते काल पंढरपूरात आषाढी वारीच्या आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी मंत्री मंडळातले इतर सहकारी आणि अधिकारी उपस्थित होते. पंढरपूर शहराचा सर्वंकष विकास आराखडा त्वरित सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी व्हीआयपी लोकांपेक्षा वारकरी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांनाच प्राधान्य राहील, त्याचप्रमाणे प्रत्येक दिंडीसाठी घोषित केलेले २० हजार रुपये त्यांच्या बँक खात्यावर वितरीत

झाल्याचंही त्यांनी सांगितलं. पंढरपूर इथं येणाऱ्या वारकऱ्यांना यावर्षी पाणी आणि फळांच्या रसाचं मोफत वाटप करणार आहे. या ठिकाणी स्वच्छता राहावी, अशी व्यवस्था करण्याचे आदेशही त्यांनी यावेळी दिले. पंढरपूरात नेहमी हजारो नागरिक दर्शनासाठी येतात, त्यामुळे १ हजार बेडच्या नवीन रुग्णालयासाठी स्वतंत्र प्रस्ताव आरोग्य विभागानं तात्काळ सादर करण्याचं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या सर्व ५५ जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांना उत्कृष्ट आणि उच्च दर्जाचं शिक्षण देण्यासाठी प्राईम मिनिस्टर कॉलेज ऑफ एक्सलंसचं उद्घाटन केंद्रिय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते काल इंदूर इथं झालं. मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री मोहन यादव यावेळी उपस्थित होते. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केल्याबद्दल आणि आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबातल्या मुलांना लाभदायक वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम हिंदीमध्ये सुरू केल्याबद्दल शाह यांनी मध्य प्रदेश सरकारचं कौतुक केलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज आसाम, उत्तर प्रदेश आणि गुजरात या तीन पूरग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून चर्चा केली. मुसळधार पावसामुळे वाढलेल्या जलस्तराची त्यांनी माहिती घेतली. आवश्यक ती सर्व मदत केंद्र सरकारतर्फे केली जाईल, तसंच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाच्या तुकड्या उपलब्ध कारून दिल्या जातील, असं आश्वासन त्यांनी तीनही राज्यांना दिलं.

**<><><><><>**

भारत आणि मार्शल आयलंड या दोन देशांमध्ये परस्पर सहकार्य आणि मैत्रीचा मोठा इतिहास असून गेल्या काही वर्षांमध्ये त्याची व्याप्ती वाढली आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज दोन देशांमधल्या

सामाजिक विकासाच्या चार प्रकल्पांसाठी करण्यात आलेल्या परस्पर सहकार्य करारावर स्वाक्षरी केल्यानंतर बोलत होते. मार्शल आयलंड हे प्रशांत महासागरातलं छोटं बेट नसून एक मोठा समुद्री देश आहे. भारतानं नेहमीच प्रशांत महासागर क्षेत्राला सहकार्य करण्याच्या आपल्या जबाबदारीचं पालन केलं आहे, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><>

भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी विक्रम मिस्त्री यांनी आज परराष्ट्र सचिवपदाचा कार्यभार स्वीकारला. काल या पदावरून कार्यमुक्त झालेल्या विनय मोहन क्वात्रा यांची जागा त्यांनी घेतली आहे. मिस्त्री हे १९८९ च्या बॅचचे अधिकारी आहेत. त्यांनी उप-राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून काम पाहिलं आहे. तसंच चीन, म्यानमार आणि स्पेनमध्ये भारतीय दूत म्हणून काम केलं आहे. त्यांनी १९९७ मध्ये इन्द्र कुमार गुजराल, २०१२ मध्ये मनमोहन सिंह आणि २०१४ मध्ये नरेंद्र मोदी अशा तीन प्रधानमंत्र्यांच्या खासगी सचिवपदाचा कार्यभारही सांभाळला आहे.

<><><><>

जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात परकीय संस्थांनी भारतीय भांडवली बाजारात २४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. गुंतवणूकदारांच्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी १५ हजार ३५२ कोटी रुपये समभाग विक्री आणि ८ हजार ४८४ कोटी रुपये कर्जाऊ बाजारात गुंतवले, ज्यामुळे १२ जुलैपर्यंत भारतीय भांडवली बाजारात निव्वळ गुंतवणूक २३ हजार ८३६ कोटी रुपये झाली, असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><>

नेपाळचे प्रधानमंत्री म्हणून के पी शर्मा ओली यांनी आज शपथ घेतली. काठमांडू इथल्या राष्ट्रपती भवनात ओली यांच्यासह त्यांच्या मंत्रीमंडळाला राष्ट्रपती

राम चंद्र पौडेल यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ओली यांचं अभिनंदन केलं असून भारत आणि नेपाळचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी आणि परस्पर सहकार्य वाढवण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं मोदी म्हणाले.

<><><><><>

गुजरातमधल्या अहमदाबाद बडोदा द्रुतगती मार्गावर आज सकाळी आनंद जवळ झालेल्या अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत. आज पहाटे चिकोरी गावाजवळ एका बसचा टायर फुटल्याने ती रस्त्याच्या बाजूला उभी होती. त्याचवेळी आलेल्या भरधाव ट्रकने या बसला धडक दिली. या अपघातात बसचा चालक आणि इतर पाचजण जागीच ठार झाले, तर एकाचा रुग्णालयात नेतांना मृत्यू झाला. जखमींवर जवळच्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत.

<><><><><>

भारतातलं किरकोळ डिजिटल पेमेंटचं प्रमाण येत्या २०३० सालापर्यंत दुप्पट होऊन सात लाख कोटी डॉलर पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. केर्नी आणि अमेझॉन पे या संस्थांनी शहरी भारत कसं पेमेंट करतो, यासंदर्भात केलेल्या संयुक्त सर्वेक्षणानंतर हा अंदाज व्यक्त केला आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये किरकोळ व्यवहारांसाठी भारतातलं डिजिटल पेमेंट वाढून तीन पूर्णांक सहा लाख कोटी डॉलर झालं आहे. भारतात यूपीआय व्यवहार ११ एप्रिल २०१६ पासून सुरु झाले. भारताची ई-कॉमर्स बाजारपेठ २०२२ मध्ये ७५ ते ८० अब्ज डॉलर होती, त्यात २०३० पर्यंत २१ टक्के वृद्धी होण्याची शक्यताही या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

<><><><><>

CUET UG अर्थात विद्यापीठ प्रवेशासाठीची सामायिक परीक्षा पुन्हा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा १९ जुलै रोजी होणार असल्याचं एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं कळवलं आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांना इ मेल द्वारे त्यांच्या विषयांचे संकेत क्रमांक कळवण्यात आले आहेत. लवकरच विद्यार्थ्यांना परीक्षेची प्रवेशपत्रं पाठवली जातील. परीक्षेनंतर विद्यार्थ्यांनी पाठवलेल्या शंकांची संख्या लक्षात घेऊन उत्तरसूचीही लवकरच अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केली जाईल, असं एनटीए नं सांगितलं.

<><><><><>

ओडिशामध्ये पुरी इथल्या भगवान जगन्नाथाच्या मंदिरातल्या रत्नभांडाराचे सर्व दरवाजे काल उघडण्यात आले. राज्य सरकारनं जारी केलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीनुसार रत्नभांडार खुलं करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून या संपूर्ण प्रक्रियेचं ध्वनीचित्रमुद्रण करण्यात येत आहे. या प्रक्रियेत मोजदाद केलेल्या दागिन्यांच्या पेट्या ठेवण्यासाठी कडक सुरक्षेसह तात्पुरता विशेष कक्ष उभारण्यात आला आहे. बाराव्या शतकातल्या जगन्नाथ
मंदिराच्या रत्नभांडारात हिरे, सोनं आणि मौल्यवान रत्नांचे दुर्मिळ दागिने आहेत. या सर्वांची तपशीलवार नोंदणी करण्यात येणार आहे. याआधी १९८५ मध्ये हे रत्नभांडार उघडण्यात आलं होतं. तर इथल्या मौल्यवान जडजवाहिरांची गणना १९७८ मध्ये करण्यात आली होती.

<><><><><>

भारत बांगलादेशचा शेजारी देश असल्याने भारतानेही तीस्ता प्रकल्प राबवावा, असं आवाहन बांगलादेशच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांनी केलं आहे. त्यांच्या नुकत्याच चीन दौऱ्याविषयी ढाका इथं झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. तीस्ता प्रकल्पाच्या व्यवहार्यता सर्वेक्षणासाठी भारत आणि चीन या

दोघांनीही प्रस्ताव दिले आहेत, मात्र तीस्ता नदीचं पाणी भारतातून येत असल्यानं हे सर्वेक्षण भारतानं करावं, असं आपलं मत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

स्पेनच्या कार्लोस अल्काराजने विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या अजिंक्यपदावर सलग दुसऱ्यांदा नाव कोरलं. काल झालेल्या अंतिम सामन्यात त्यानं सर्बियाच्या द्वितीय मानांकित आणि सात वेळा विम्बल्डन विजेत्या नोव्हाक जोकोविचचा ६-२, ६-२, ७-६ असा थेट सेट्समध्ये पराभव केला. पहिले दोन सेट सहज जिंकल्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये अल्कराजला जोकोविचने टायब्रेकरपर्यंत खेचलं, पण अल्काराजने टायब्रेकर जिंकून सामनाही खिशात घातला. मिश्र दुहेरीत पोलंड आणि तैवानच्या यान जेलिन्की आणि सू वे शे या जोडीनं मेक्सिकोच्या सँतियागो गोन्झालेस आणि जुलियाना ओलमोस यांच्यावर ६-४, ६-२ अशी मात केली.

<><><><>

महाराष्ट्राच्या बहुतांश भागात पावसाचा जोर वाढत आहे. **कोकण** रेल्वेमार्गावर दिवाणखवटी ते विन्हेरे या स्टेशन्स दरम्यान काल संध्याकाळी दरड कोसळल्यामुळे ठप्प झालेली वाहतूक अद्याप सुरू झालेली नाही. दरड हटवण्याचं काम युद्धपातळीवर सुरू असलं, तरी अतिमुसळधार पावसामुळे कामात अडथळे येत आहेत. प्रवाशांना मुंबईला सोडण्यासाठी एसटी बसेसची व्यवस्था करण्यात येत आहे. अनेक गाड्यांचे मार्ग वळवण्यात आले आहेत.

<><><><>

भारतीय हवामान विभागाने आज उत्तराखंड तसंच उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या पूर्व भागात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

//<><><><><>//